दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.१३ ऑक्टोबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ५६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 13 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 56 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## महायुती सरकार 'निजाम-इंग्रजांपेक्षाही पुढे'

**मुंबई**–महाराष्ट्रात इंग्रज आणि निजामापेक्षाही पलिकडे जाऊन महायुती सरकार वागत आहे. जनसुरक्षा कायदा आणून आपल्या व्यक्ती स्वातंत्र्याचा वापर करून सरकारच्या, प्रशासनाच्या विरोधात आवाज उचलणे सुद्धा आता शहरी नक्षलवादी घोषित करण्याचा संकल्प महायुती सरकारने केलो आहे. असा प्रकार इंग्रजांनी पण कधी केला नव्हता. त्यांनी कधी असे म्हटले नव्हते की, तुम्ही आतंकवादी किंवा नक्षलवाद आहात. त्यांच्या काळातही तुमचे मत मांडता येत होते. पण भाजपने ज्या पद्धतीने आज महाराष्ट्रात आणि देशात एक प्रकारची अघोषित आणीबाणी सुरू केलेली आहे, ते निजाम आणि इंग्रजांपेक्षाही पुढची आहे. त्यामुळे लोकशाहीचा घात करण्याचे पाप ज्या लोकांनी केले, त्यांना बोलण्याचा कुठलाही अधिकार नाही, अशी टीका नाना पटोले यांनी केली.

# उद्धव ठाकरे एमआयएम काय,पाकलाही सोबत घेतील-एकनाथ शिंदेंचा निशाणा

## कधी घराचा उंबरठा न ओलांडणारे आता हंबरडा फोडत असल्याचा टोला

### कधी घराचा उंबरठा न ओलांडणारे आता हंबरडा फोडत आहेत

**मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, कधी घराचा उंबरठा न ओलांडणारे आता हंबरडा फोडत आहेत. जेव्हा लोकांच्या सेवेसाठी बाहेर पडायची वेळ होती, तेव्हा हेच लोक म्हणायचे आमचे हात रिकामे आहेत. आता अचानक भावनिक मोर्चे काढून सहानुभूती मिळवायचा प्रयत्न केला जातोय. राज्यातील शेतकरी संकटात आहेत. आम्ही त्यांच्या बांधाबांधावर गेलो, त्यांच्या डोळ्यातले अश्रू पाहिले आणि ठरवले की, या वेळी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायचे. म्हणूनच आम्ही एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून, अटीशर्ती न पाहता मोठ्या प्रमाणात मदत जाहीर केली, असे शिंदे म्हणाले.**

**मुंबई (वृत्तसंस्था)**–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज महाविकास आघाडीवर तीव्र शब्दांत हल्ला चढवला. संभाजीनगरमधील मोर्चाला चखच् चा पाठिंबा आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी निवडणूक आयोगाच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर थेट निशाणा साधला.हे लोक निवडणुका जिंकण्यासाठी कोणालाही सोबत घेतील. आज एमआयएम आहे, उद्या पाकिस्तानलाही सोबत घेतील. त्यांचा काही भरोसा राहिलेला नाही, असे खळबळजनक विधान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. एकनाथ शिंदे म्हणाले की, मागच्या निवडणुकीत पाकिस्तानचे झेंडे नाचवले गेले. काहींनी दहशतवाद्यांच्या कबरी सजवण्याचे काम केले होते. आता तेच लोक घटनात्मक पदांवर, सर्वोच्च न्यायालयावर आणि निवडणूक आयोगावर टीका करत आहेत. पण आज तेच आयोगाकडे जात आहेत. ही चांगली सुधारणा म्हणावी लागेल, असा टोला त्यांनी लगावला.शिंदे म्हणाले की, शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही, असं आम्ही सांगितलं होते. आज



त्यांच्या खात्यात मदतीचे पैसे जमा होत आहेत. आम्ही ३२ हजार कोटींचे पॅकेज दिले, ४७ हजार हेक्टरी मदत केली, तर जमीन वाहून गेलेल्या शेतकऱ्यांना मनरेगामार्फत प्रत्येकी साडेतीन लाख रुपये दिले. इतिहासात कधीच इतकी मदत शेतकऱ्यांना मिळाली नव्हती, असा दावा त्यांनी केला.शिंदे म्हणाले की, शेतकऱ्यांची चिंता आम्ही मिटवली. त्यांचा दसरा चांगला झाला, दिवाळी आणखी चांगली होईल. आम्ही प्रत्यक्ष मदत पोचवली, मोठमोठे किट दिले. पण हे लोक शेतकऱ्यांच्या नावावर राजकारण करत आहेत. शेतकऱ्याच्या पोराच्या डोळ्यात अश्रू पाहून किमान बिस्कीटचा पुडा तरी दिला का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या मोर्चावर टीका करताना म्हटले की, हे कसले हंबरडा मोर्चे काढतात? सत्ता गेली तेव्हा हंबरडा फोडला, खुर्ची गेली तेव्हा हंबरडा फोडला. आता शेतकऱ्यांच्या नावाखाली हंबरडा फोडत आहेत. हे पुतणा-मावशीचे प्रेम आहे. निव्वळ राजकीय नाटक आहे.आम्ही बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर चालतो. बाळासाहेब ब्रँड हाच आमचा ब्रँड आहे. केलेल्या कामाच्या जोरावर आणि जनतेच्या आशीर्वादाने आगामी महापालिका निवडणुकीत महायुतीचाच विजय होणार, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

### बाळासाहेब ठाकरे ब्रँड हाच आमचा ब्रँड

**शिंदे यांनी पुढे सांगितले की, आमचा एकच ब्रँड आहे. बाळासाहेब ठाकरे ब्रँड. त्याच विचारांवर आणि केलेल्या विकासकामांच्या जोरावर महायुती येणाऱ्या निवडणुकीत विजयी होणार, असा मला ठाम विश्वास असल्याचेही ते म्हणाले. मी फक्त बाळासाहेब ब्रँड ओळखतो, बाकी कोणताही नाही. मला फक्त बाळासाहेब ठाकरे ब्रँड माहिती आहे. असे सांगत एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या ठाकरे बँडच्या वक्तव्यावर निशाणा साधला. महापालिका निवडणुकीत महायुतीलाच यश मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**


# सरपंच देशाला महासत्ता बनवू शकतो-आदर्श सरपंच पेरे पाटील यांचे जयनगर येथे व्याख्यान प्रसंगी प्रतिपादन

दैनिक वादळ वार्ता

**बोरद । मंगेश पाटील**

देशासाठी, मानवाच्या कल्याणासाठी चांगली कामे करा. महाराष्ट्र समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत जयनगर गावाला जिल्ह्यात प्रथम आणायचे असेल तर ग्रामस्थांनी यात सहभागी व्हायला हवे. ग्रामस्थांचा विकास कामांमध्ये सहभाग राहिला तर सरपंच देशाला महासत्ता बनवू शकतो असे प्रतिपादन मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानासाठी जनजागृती व ग्राम विकासावर विशेष व्याख्यान प्रसंगी आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील (पाटोदा) यांनी जयनगर येथे केले.

व्याख्यानाचा सुरवातीला मान्यवरांचे हस्ते भारतमाता, संत गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी यशदा संस्थेचे ट्रेनर नीता पाटील, गटविकास अधिकारी एस. टी. सोनवणे, सारंगखेडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रमेश वावरे, सरपंच मोगराज सोनवणे, गटनेता तथा उपसरपंच वनश्री ईश्र्वर संतोष माळी, ग्रामसेवक बी. ए. पाटील, ग्रामपंचायत सदस्य, परिसरातील गावांमधील सरपंच,



उपसरपंच, पोलीस पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. ग्रामपंचायतच्या वतीने भास्करराव पेरे पाटील यांना वृक्ष व तीर्थक्षेत्राचे गाव असल्यामुळे हेरंब गणेशाची प्रतिमा भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. भास्कर पेरे पाटील यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले की, गावाचा विकास झाला तर देशाचा विकास होईल. ग्रामस्थांनी जुन्या चालीरीती, प्रथा बंद केल्या पाहिजेत. शिक्षण महत्त्वाचे असून सगळ्या पालकांनी आपल्या पाल्यांच्या शिक्षणाला महत्त्व द्यायला हवे. महाराष्ट्र समृद्ध पंचायतराज अभियान गावाच्या कल्याणासाठी आहे. त्यासाठी सर्व गावकऱ्यांनी जास्तीत जास्त झाडे लावा, गावात स्वच्छता राखण्यास प्राधान्य द्यायला हवे. आरोग्यासाठी बाहेरचे अन्नपदार्थ खाऊ नये. यासह त्यांनी आपल्या २५ वर्षाच्या सरपंच कारकीर्दीत केलेल्या विकास कामांची माहितीही त्यांनी ग्रामस्थांसमोर मांडून गाव विकासात ग्रामस्थांचा सहभाग कसा महत्त्वाचे असते हे सांगितले. तुमच्या गावाचा विकास करायचा असेल तर प्रत्येक ग्रामस्थांनी सरपंचाला प्रत्येक विकास कामाच्या वेळी साथ द्यायला हवी. तसेच ग्राम विकासाच्या कामांमध्ये महिलांनीही सहभाग घ्यायला हवे असे त्यांनी यावेळी व्याख्यानात सांगितले. सारंगखेडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रमेश वावरे यांनीही ग्रामस्थांना व्यसनाच्या आहारी न जाता निर्व्यसनी राहण्याचा सल्ला देऊन चांगल्या कामासाठी मी सदैव ग्रामस्थांच्या पाठीशी आहे असे सांगितले. मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानाचे प्रास्ताविक नीता पाटील यांनी केले. तर व्याख्यानाचे प्रास्ताविक उपसरपंच ईश्र्वर संतोष माळी यांनी केले. सूत्रसंचालन मुख्याध्यापक आय. डी. माळी यांनी केले. तर ग्रामविकास अधिकारी बी. ए. पाटील यांनी आभार मानले. व्याख्यान यशस्वितेसाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. व्याख्यानासाठी पंचक्रोशीतील मोठ्या प्रमाणावर पुरुषांसह महिला वर्गही मोठ्या प्रमाणावर ऐकण्यासाठी उपस्थित होते.

# तळोद्यात विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाकडून मंदिर स्वच्छता अभियानाचा प्रारंभ


दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

विश्व हिंदू परिषद (विहिंप) आणि बजरंग दलाच्या तळोदा प्रखंड शाखेमार्फत दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिर स्वच्छता मोहीम राबविण्यास १२ ऑक्टोबर २०२५ पासून सुरुवात झाली आहे. वार्षिक नियोजनानुसार सकाळी आठ वाजता कणकेश्वर मंदिरापासून या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी या स्वच्छता मोहिमेत उत्साहाने सहभाग घेतला. सुरुवातीला कणकेश्वर मंदिर आणि परिसरातील अंबाजी माता मंदिराची सफाई करण्यात आली. त्यानंतर आमलाड येथील विहिंपचे दत्तक हनुमान मंदिर परिसर, देव मोगरा माता मंदिर आणि फॉरेस्ट कार्यालयातील दत्त मंदिराच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली.

पहिल्याच दिवशी एकूण पाच मंदिर परिसराची स्वच्छता करण्यात येऊन अभियानाची यशस्वी सुरुवात झाली आहे. हे अभियान आता एक



महिनाभर चालणार असून, या दरम्यान शहरातील विविध मंदिरांची स्वच्छता केली जाणार आहे.

आजच्या या मोहिमेत प्रखंड मंत्री दीपक चौधरी, प्रखंड अध्यक्ष प्रा. आर.डी. मोरे, प्रखंड सहमंत्री पवन शेलकर, मठ मंदिर प्रमुख आनंद मराठे आणि जिल्हा सेवा प्रमुख तसेच विहिंपचे ज्येष्ठ कार्यकर्ते ऋषिकेश बारगळ यांनी मंदिर परिसर स्वच्छ करण्यासाठी परिश्रम घेतले.

# माणिकराव कोकाटेंची नाशिक, धुळे, जळगाव जिल्ह्यांचे संपर्कमंत्री म्हणून नियुक्ती

दैनिक वादळ वार्ता **। वृत्तसेवा**

पावसाळी अधिवेशनात सभागृहात 'रमी' खेळताना दिसलेल्या व्हिडिओमुळे एकदा वादात अडकलेल्या आणि मंत्रीपद गमावलेल्या कोकाटे काही काळ चर्चेत दिसून आले नाही. पण परवाच अजित पवारांनी छगन भुजबळ यांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केल्यानंतर आता माणिकराव कोकाटे यांना नाशिकसह ३ जिल्ह्याचे संपर्कमंत्री म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने ही निवड करण्यात आल्याचे बोलले जात आहे. यामुळे आगामी निवडणुकीत नाशिक, धुळे आणि जळगाव या तीन जिल्ह्यातील माणिकराव कोकाटे यांच्या निकटवर्तीयांना संधी मिळणार असल्याचे बोलले जात आहे.नाशिक जिल्ह्यात सध्या पालक मंत्रिपद रिक्त आहे. अशा वेळी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोकाटे यांना नाशिकचे संपर्कमंत्री केले आहे. कोकाटे यांचा नाशिक जिल्ह्यातील दांडगा जनसंपर्क आणि सिन्नरमधून निवडून आलेले



आमदार या नात्याने त्यांचा स्थानिक राजकारणात प्रभाव आहे, हेही पक्षासाठी फायदेशीर ठरण्याची शक्यता आहे.राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते आणि नाशिकचेच छगन भुजबळ यांना डावलल्याच्या चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. भुजबळ हे नाशिकच्या पालकमंत्रिपदासाठी इच्छुक होते, शिवाय त्यांचा या भागात दीर्घकाळापासून प्रभाव आहे. तरीही पक्षाने ही जबाबदारी कोकाटे यांच्यावर सोपवली आहे, हे अनेकांच्या भुवया उंचावणारे ठरत आहे.

# कुपोषणमुक्तीकडे दमदार पाऊल!

## तळोदा तालुक्यातील ११५ अंगणवाड्यांना 'सेंट्रल किचन' मार्फत पोषण आहार; २६ अंगणवाड्या 'डिजिटल' होणार

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

कुपोषणाच्या विळख्यात सापडलेल्या नंदुरबार जिल्ह्यासाठी एक अत्यंत दिलासादायक आणि महत्त्वपूर्ण योजना तळोदा तालुक्यात यशस्वीपणे राबवली जात आहे. जिल्ह्यातील बालकांना सुयोग्य पोषण आहार मिळावा या उद्देशाने राज्य शासनाच्या निर्देशानुसार, तळोदा तालुक्यातील ११५ अंगणवाडी केंद्रांना आता सेंट्रल किचन मार्फत अन्नाचा पुरवठा सुरू झाला आहे.

फीडिंग इंडिया कंपनी द्वारे चालवण्यात येत असलेल्या या सेंट्रल किचनमधून, शासनाने ठरवून दिलेल्या उच्च निकषांनुसार आहाराचा पुरवठा केला जात आहे. बोरद येथील नऊ अंगणवाड्यांमध्ये याची



प्रत्यक्ष पाहणी केली असता, पुरवठा अत्यंत चांगल्या दर्जाचा असल्याचे दिसून आले.

रोज सकाळी ठीक ११ वाजता वाहनाच्या माध्यमातून येणाऱ्या आहारामध्ये डाळभात, एक पालेभाजी आणि पोळ्या यांचा समावेश असतो. सकाळी ९ वाजता बालकांना पोषण आहाराची कमतरता भरून काढणारा नाश्ता देखील वितरित केला जातो.

बालकांची प्रोटीन ची गरज लक्षात घेऊन त्यांना गरजेनुसार अंडी देखील दिली जात आहेत.

शिजवून आणलेला आणि गरम असलेला हा आहार बालकांना अधिक आवडत असल्याने, या ठिकाणी उपस्थित असलेले पालक अत्यंत आनंदी दिसून आले.

केवळ आहारच नाही, तर बालकांच्या शिक्षणाकडेही तळोदा तालुक्याने लक्ष दिले आहे. एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत २६ अंगणवाड्यांची निवड डिजिटल अंगणवाडी होण्यासाठी करण्यात आली आहे.

या अंगणवाड्यांच्या भिंती आता रंगीबेरंगी असतील आणि डिजिटायझेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना हसत-खेळत शिक्षण दिले जाईल. यामुळे अंगणवाडीत येणाऱ्या प्रत्येक बालकामध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण होऊन त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास मदत होईल. नंदुरबार जिल्हा प्रशासनाने हाती घेतलेल्या या दुहेरी उपक्रमामुळे तळोदा तालुका कुपोषणमुक्तीच्या आणि गुणात्मक शिक्षणाच्या दिशेने अतिशय महत्त्वपूर्ण पाऊल टाकत आहे.

संपादकीय

# महागाई आटोक्यात, पण दिलासा हवा!

अलीकडेच किरकोळ महागाईचे आकडे जाहीर झाले. जुलैच्या तुलनेत ऑगस्टमध्ये किरकोळ महागाई पुन्हा एकदा दोन टक्क्यांच्या पुढे गेली. तथापि, याबद्दल काळजी करण्याची गरज नाही. तज्ज्ञांचा विश्वास आहे की, चालू आर्थिक वर्षात 'कोअर इन्फ्लेशन' ३.२ टक्के असू शकते. ते मागील अंदाजांपेक्षा कमी आहे. दुसरीकडे, रिझर्व्ह बँक चालू आर्थिक वर्षात ईएमआय कपातीच्या स्वरूपात हा फायदा सामान्य जनतेला देऊ शकते.गेल्या अनेक महिन्यांपासून महागाईचे आकडे कमी होत असताना, अन्नधान्याच्या किमती वाढल्यामुळे ऑगस्टमध्ये एकूण महागाईचे आकडे वाढले आहेत. असे असूनही काळजी करण्याची गरज नाही, असे म्हणायला जागा आहे. 'क्रिसिल' या संशोधन आणि रेटिंग फर्मने म्हटले आहे, की २०२५-२६ या आर्थिक वर्षात 'कोअर इन्फ्लेशन' ३.२ टक्के राहण्याचा अंदाज आहे. तो त्यांच्या पूर्वीच्या ३.५ टक्के अंदाजापेक्षा कमी आहे. 'क्रिसिल'ने त्यांच्या ताज्या अहवालात म्हटले आहे, की चालू आर्थिक वर्षात ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय)मध्ये १.४ टक्के घट दर्शवते. त्यामुळे आर्थिक सुलभतेसाठी सकारात्मक वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. अहवालात म्हटले आहे, की रिझर्व्ह बँक या वर्षी व्याजदरात २.५ टक्के कपात करू शकते. 'क्रिसिल'च्या मते जागतिक स्तरावरील अडचणी वाढत असताना कमी महागाई आणि कमी व्याजदरांमुळे अर्थव्यवस्थेत देशांतर्गत मागणी वाढेल. अहवालात असेही म्हटले आहे, की खरीप हंगामात अतिवृष्टी ही एक जोखीम आहे. त्यामुळे पंजाबसारख्या प्रमुख बागायती आणि अन्नधान्य उत्पादक प्रदेशांना अडथळा येऊ शकतो. अन्न महागाई कमी पातळीपासून वाढू लागली आहे; परंतु तरीही ती मुख्य चलनवाढीपेक्षा कमी आहे.ऑगस्टमध्ये किरकोळ महागाई मासिक आधारावर २.०७ टक्क्यांवर पोहोचली. ही वाढ प्रामुख्याने भाज्या, मांस आणि माशांच्या वाढत्या किमतींमुळे झाली. मागील महिन्यात जुलैमध्ये ती १.६१ टक्के होती. ग्राहक किंमत निर्देशांका(सीपीआय)मध्ये सलग नऊ महिन्यांच्या घसरणीनंतर महागाईमध्ये ही वाढ झाली आहे. नोव्हेंबर २०२४ पासून ती कमी होत होती. तथापि, वार्षिक आधारावर ग्राहक किंमत निर्देशांका(सीपीआय)वर आधारित महागाई कमी झाली आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये ती ३.६५ टक्के होती. या कालावधीत अन्न महागाई शून्यापेक्षा खाली म्हणजेच ०.६९ टक्क्यांनी घसरली. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) म्हटले आहे, की ऑगस्ट २०२५ मध्ये एकूण महागाई आणि अन्नधान्याच्या महागाईत प्रामुख्याने भाज्या, मांस आणि मासे, अंडी, तेल आणि चरबी, वैयक्तिक काळजी आणि अन्न उत्पादनांच्या किमती वाढल्यामुळे वाढ झाली. सरकारने रिझर्व्ह बँकेला दोन टक्के मार्जिनसह महागाई चार टक्के राखण्याचे आदेश दिले आहेत. ग्रामीण भारतातील महागाई जुलैमधील १.१८ टक्क्यांवरून ऑगस्टमध्ये १.६९ टक्क्यांपर्यंत वाढली. शहरी भागात महागाई २.४७ टक्के होती, जी मासिक आधारावर २.१ टक्के होती. केरळमध्ये सर्वाधिक ९.०४ टक्के महागाई होती, तर आसाममध्ये सर्वात कमी म्हणजे उणे ०.६६ टक्के होती. भारतीय जनतेला अमेरिकेसोबतच्या वाढत्या व्यापार युद्धाच्या झळा बसण्याची शक्यता आहे. अमेरिकेने पन्नास टक्के व्यापार शुल्क लागल्यानंतर वेगवेगळ्या क्षेत्रांमधील भाववाढीचा दर वाढण्याची शक्यता आहे. मात्र दुसरीकडे, केंद्र सरकारने वस्तू व सेवाकरात, म्हणजे जीएसटीत लक्षणीय कपात केल्यामुळे दिलासादेखील मिळू शकतो. असे असले तरी वाढत्या महागाईची चिन्हे ऑगस्ट महिन्यातच दिसू लागली हे समजून घेतले पाहिजे. भाज्या, मांस आणि माशांसह ठरावीक अन्नपदार्थांच्या किमती वाढल्यामुळे ऑगस्ट २०२५ मध्ये किरकोळ महागाई दराने २.०७ टक्क्यांची पातळी गाठली आहे. ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाईचा दर जुलैमध्ये १.६१ टक्क्यांपर्यंत घसरला होता, तर ऑगस्ट २०२४ मध्ये तो ३.६३ टक्के इतका नोंदवला गेला होता. एनएसओ म्हणजेच राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार ऑगस्ट २०२५ मध्ये भाजीपाला, मांस, मासे, अंडी, तेल, वैयक्तिक निगा उत्पादने यांच्या किमतीत वाढ झाली. त्यामुळे अन्नधान्य भाववाढीसह मुख्य महागाई दरात वाढ झाली.ऑगस्टमध्ये भाजीपाल्याच्या किमतीत जवळपास १६ टक्के वाढ झाली. सर्वसामान्य लोकांना रोजच्या जेवणात भाजी लागते. त्यामुळे ही दरवाढ चिंताजनक म्हणावी लागेल. मांस आणि माशांच्या किमती दीड टक्के दराने वाढल्या, तर दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा महागाई दर ऑगस्टमध्ये २.६ टक्के होता. कपडे आणि पादत्राणांच्या महागाईचा दर जुलैमधील अडीच टक्क्यांवरून किंचित घसरला. इंधन आणि ऊर्जा क्षेत्रातील भाववाढही घसरून २.४ टक्क्यांवर पोहोचली. जुलैमध्ये ती २.७ टक्के होती. केंद्र सरकारने रिझर्व्ह बँकेला किरकोळ महागाई दर चार टक्क्यांच्या पातळीवर मर्यादित राखण्याचे निर्देश दिले आहेत. अन्नधान्य महागाईचा दर जुलै २०२५ च्या तुलनेत ऑगस्ट २०२५ मध्ये १०७ आधारबिंदूंनी वाढला आहे. ग्रामीण भागात तर अन्यधान्याची भाववाढ शहरांपेक्षा जास्त असून सरकारला याची दखल घ्यावी लागेल. विशेष म्हणजे कम्युनिस्टांच्या केरळमध्ये ऑगस्टमध्ये सर्वाधिक एकत्रित महागाई ९.०४ टक्के, तर कर्नाटकमध्ये ३.८१ टक्के होती. आर्थिक विकास होतो, तेव्हा काही प्रमाणात चलनवाढ होतेच; परंतु कोणत्या वस्तूंची आणि किती प्रमाणात किंमत वाढ होते, हे पाहणे महत्त्वाचे असते. भाववाढीची झळ गोरगरीब वर्गाला कमीत कमी लागावी, असा विचार करावाच लागतो. बरोबर नऊ वर्षांपूर्वी म्हणजे २०१६ मध्ये चलनवाढीचा दर चार टक्क्यांच्या मर्यादेत राहावा, असे धोरण ठरवण्यात आले. त्याचा टॉलरन्स बँड, म्हणजेच सहनशीलतेची मर्यादा खालच्या पातळीवर दोन टक्के आणि वरच्या पातळीवर सहा टक्के अशी निश्चित करण्यात आली. केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँकेनेच हे धोरण ठरवले; परंतु दर पाच वर्षांनी या धोरणाचा आढावा घ्यायचा, असेही ठरले होते. या धोरणाचा फेरआढावा मार्च २०२४ च्या आत पूर्ण झाला पाहिजे, अशी अपेक्षा होती. जानेवारी २०१४ पासून म्हणजेच केंद्रात नवे सरकार येण्यापूर्वीपासूनच येण्याच्या अगोदर सहा महिने भारतीय रिझर्व्ह बँकेने घाऊक किमतींपेक्षा किरकोळ किंमत वाढीवर लक्ष केंद्रित करण्यास सुरुवात केली. हे धोरण यशस्वी ठरले असून, त्यामुळे किरकोळ पातळीवरची महागाई टप्प्याटप्प्याने कमी झाली आहे. २०१२-१३ मध्ये किरकोळ किंमत निर्देशांकावर आधारित भाववाढ दहा टक्के होती. ती चालू आर्थिक वर्षात ३.१ टक्क्यांवर आली. या संपूर्ण वर्षात चलनफुगवट्याचा सरासरी दर अडीच टक्क्यांवर येईल, अशी आशा आहे. याचे कारण भरपूर पाऊस झाला आहे आणि वस्तू आणि सेवाकराचे दर कमी झाले आहेत. उच्च गतीने निरंतर आर्थिक विकास साधायचा असेल, तर चलनफुगवटा कमी पातळीवर आणि स्थिर स्वरूपाचा असणे आवश्यक ठरते. वस्तूंच्या किमती झपाट्याने वाढत गेल्यास ग्राहकांची खरेदीशक्ती कमी होत जाते. दुसरीकडे, किमतीत अत्यल्प वाढ होत असल्यास कारखानदारांचा उत्पादनातील रस कमी होतो.रिझर्व्ह बँकेचे माजी कार्यकारी संचालक जनक राज हे बँकेच्या एमपीसी, म्हणजेच मॉनेटरी पॉलिसी कमिटीचे सदस्यदेखील होते. त्यांच्या मते सध्याचा टॉलरन्स बँड कायम ठेवला पाहिजे. रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर पूनम गुप्ता यांनीही विद्यमान धोरणाचे समर्थनच केले आहे. मात्र एमपीसीचे २०१६ ते २०२० या काळात सदस्य असलेले अर्थतज्ज्ञ रवींद्र ढोलकिया यांच्या मते चलनफुगवट्याची चार टक्क्यांची मर्यादा ही खूप कमी आहे. विकसित भारताच्या दृष्टिकोनातून साडेपाच टक्के चलनफुगवटा ही मर्यादा योग्य राहील. याउलट एमपीसीवर काम केलेल्या काही सदस्यांनी चलनफुगवट्याचे लक्ष्य हे अडीच टक्क्यांपर्यंत खाली आणण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. रिझर्व्ह बँकेने 'हेडलाइन इन्फ्लेशन'वर भर द्यावा की फक्त अन्नेतर वस्तूंच्या महागाईवर भर द्यावा, याबद्दलही मतभेद आहेत. मात्र या सगळ्यांपलीकडे राजकीय वास्तवाचा विचार करूनच निर्णय घेतले जातात. ८० कोटी जनतेला मोफत अन्नधान्य दिले जात असून 'लाडकी बहीण' धाटणीच्या योजनेला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. याचा अर्थ अजूनही बहुसंख्य जनतेला भाववाढीशी झुंजावे लागत आहे. दैनंदिन गरजा भागवण्यासाठी त्यांच्या खिशात पुरेसे पैसे नाहीत, हे कठोर वास्तव आहे.

# मदतीचा शिडकावा

राज्यातील पूरग्रस्तांसाठी मदत म्हणून राज्य सरकारने जाहीर केलेली आर्थिक मदत हे आजवरचे सर्वांत मोठे पॅकेज असल्याचा दावा करण्यात येत असला, तरी अतिवृष्टीमुळे सर्वस्व गमावलेल्या शेतकऱ्यांसाठी हा मदतीचा केवळ शिडकावाच म्हणावा लागेल. पुराने २९ जिल्ह्यांमध्ये झालेले अतोनात नुकसान, राज्य सरकारपुढील आर्थिक मर्यादा आणि केंद्र सरकारने अद्याप ठेवलेली झाकली मूठ यांमुळे ही स्थिती निर्माण झाली, असे सध्याचे तरी चित्र आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह एकनाथ शिंदे व अजित पवार या उपमुख्यमंत्रीद्वयांनी जाहीर केलेल्या ३१ हजार कोटी रुपयांच्या या पॅकेजमध्ये नियम व निकषांच्या 'किंतु-परंतु'रूपी अडचणी दिसून येत असल्याने ही मदत शेतकऱ्यांपर्यंत कशी व किती पोहोचणार, याबाबत शंका निर्माण होणे साहजिक आहे. ही सरकारी मदत बाधित शेतकऱ्यांना तातडीची म्हणून उपयोगी पडू शकते.अतिवृष्टीमुळे २९ जिल्ह्यांमधील साडेपाचशे तालुके बाधित झाले. त्यामध्ये सुमारे साठ लाख हेक्टर शेतीवरील पिके उद्ध्वस्त झाली. पुरामध्ये सव्वातीनशे नागरिकांचे बळी गेले, ४३ हजार घरांची पडझड झाली, ११ हजार विहिरी बुजल्या. घरांतील चीजवस्तू, गोठ्यातील जनावरे, उद्योग, दुकाने यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. उभी पिके तर नष्ट झालीच; पण सारी जमीन खरवडून गेल्याने येत्या काही हंगामांत तेथे काही उगवण्याची शक्यता मावळली आहे. हे दीर्घकालीन नुकसान कसे भरून काढायचे, या प्रश्नाने शेतकऱ्यांची झोप उडवली आहे. त्या पार्श्वभूमीवर सरकारने ३१ हजार ६३८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर



केले आहे. त्यामध्ये कोरडवाहू जमिनींसाठी प्रतिहेक्टर साडेआठ हजार रुपये, हंगामी बागायतीसाठी १७ हजार, तर बहुवार्षिक पिकांसाठी साडेबावीस हजार रुपयांची मदत मिळणार आहे.रब्बीसाठी मदत म्हणून प्रतिहेक्टरी दहा हजार रुपये मिळतील. विमाधारक शेतकऱ्यांना १७ हजार रुपये प्रतिहेक्टर भरपाई मिळणार आहे. खरवडून गेलेल्या जमिनींसाठी प्रतिहेक्टर ४७ हजार रुपये, घरे-गोठ्यांच्या नुकसानीसाठी भरपाई, विहिरींसाठी ३० हजार रुपयांसह मृत-जखमींच्या कुटुंबीयांना मदत व घरातील वस्तूंसाठी मदत मिळणार आहे. दुष्काळाच्या निकषांनुसार महसुलातून सूट, पीककर्जांचे पुनर्गठन, शेतीकर्ज-शेतीपंपांच्या वीजबिल वसुलीला स्थगिती आणि विद्यार्थ्यांना शुल्कमाफीसारख्या काही सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून दिवाळीपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर ही मदत पोहोचेल, असा प्रयत्न करण्याची हमी मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. संबंधित जिल्ह्यांमध्ये झालेले नुकसान पाहता, आभाळच फाटले तर ठिगळ तरी कुठे कुठे लावणार, असेच म्हणण्याची वेळ सरकारवर आल्याचे दिसते.या पॅकेजच्या तपशिलात डोकावल्यास त्याच्या मर्यादा स्पष्टपणे समोर येतात. या मदतीत निकष-नियमांचे अडसर भरपूर आहेत. त्याऐवजी सरसकट मदतीच्या घोषणेतून शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला असता. यातील बहुतांश मदत ही पूर्वी राष्ट्रीय आपत्तीच्या निकषांनुसारच मिळणे अपेक्षित होती; त्यावर भरीव मदत मिळालेली नाही, हादेखील मोठा आक्षेप आहे. महत्त्वाचे म्हणजे, शेतीचा उत्पादनखर्च जिरायतीसाठी ५० हजार ते एक लाख रुपये आणि बागायतीसाठी त्याहूनही मोठा आहे. त्या तुलनेत हेक्टरी साडेआठ ते २२ हजार रुपये ही मदत अत्यंत तोकडी ठरते. यातील १७ हजार रुपयांसाठी फक्त विमाधारक शेतकरीच पात्र ठरणार आहेत.आजवरचे अनुभव पाहता, विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना भरपाई मिळवून देणे किती दिव्य असते, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. खरवडलेल्या जमिनी पुन्हा सुपीक करण्यासाठीही भरपाईच्या तुलनेत खर्च किती तरी मोठा आहे. त्यासाठी काही वर्षे उत्पादनाविना काढावी लागण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची विरोधकांची मागणी सरकारने अद्याप तरी अंगाला लावून घेतलेली नाही.'लाडकी बहीण'सारख्या योजनांचे जड झालेले ओझे आणि सात लाख कोटी रुपयांच्या कर्जाचा डोंगर पाहता पैशांचे सोंग कसे आणणार, हा प्रश्न फडणवीस-अजित पवारांपुढे पडल्यास नवल नाही. पंजाबने आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदत केली; अर्थात नुकसानीची व्याप्ती महाराष्ट्रात अनेक पटींनी मोठी आहे. अशा स्थितीत केंद्राने मदतीचा हात पुढे करणे, ही काळाची गरज आहे. बिहारमध्ये निवडणुकीच्या तोंडावर अब्जावधी रुपयांच्या 'रेवड्या' वाटणाऱ्या केंद्राने महाराष्ट्रातील बळीराजाला वाचवण्याचे कर्तव्यही पार पाडले पाहिजे.

# सुरक्षित व्यवहाराचे पाऊल

भारतात पैशांची देवाणघेवाण करण्यासाठी सध्या सर्वाधिक लोकप्रिय असलेल्या युनिफाइड पेमेंट इंटरफेस (यूपीआय) या डिजिटल प्रणालीत आता आणखी सुलभता आणण्यात आली आहे. 'यूपीआय'चे व्यवस्थापन पाहणाऱ्या 'नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'ने (एनपीसीआय) आता पिनसोबतच चेहरा व बोटांचे ठसे वापरूनही व्यवहार करण्याची सोय आठ ऑक्टोबरपासून उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे हे व्यवहार आता अधिक सुरक्षित होतील, असा विश्वास 'एनपीसीआय'ने व्यक्त केला आहे.मुंबईत सध्या सुरू असलेल्या ग्लोबल फिनटेक फेस्टिव्हलमध्ये सर्वप्रथम या सुविधेचे सूतोवाच व सादरीकरण करण्यात आले. या प्रक्रियेत ग्राहकांच्या आधार प्रणालीतील बायोमेट्रिक डेटा वापरण्यात येईल. आतापर्यंत यूपीआयद्वारे पैसे देण्यासाठी संख्यात्मक पिन टाकणे बंधनकारक होते. रिझर्व्ह बँकेच्या नव्या नियमांनुसार, आता इतर ओळख पद्धतींनाही परवानगी देण्यात आली आहे.भारतीय ग्राहक दैनंदिन गरजेच्या




वस्तू आणि लहान रकमा देण्यासाठी यूपीआयचा वापर करतात आणि मोठ्या खरेदीसाठी क्रेडिट कार्ड वापरतात, असे एका पाहणीत आढळून आले आहे. गेल्या (सप्टेंबर) महिन्यात 'यूपीआय'ने १९ अब्ज ६३ कोटी व्यवहारांची नोंद केली. त्याच्या आधीच्या महिन्यात, म्हणजे ऑगस्टमध्ये २० अब्ज एक कोटी व्यवहार नोंदले गेले होते. त्या तुलनेत सप्टेंबरमध्ये घट दिसत असली, तरी मूल्याच्या दृष्टीने सप्टेंबरमध्ये थोडे अधिकच व्यवहार झाले आहेत. ऑगस्टमध्ये 'यूपीआय'द्वारे २४.८५ लाख कोटी रुपयांचे व्यवहार झाले, तर सप्टेंबरमध्ये २४.९० कोटी रुपयांच्या व्यवहारांची नोंद झाली. एवढ्या प्रचंड रकमेचे व प्रचंड प्रमाणात व्यवहार होत असल्याने, यूपीआय हे कायमच सायबर गुन्हेगारांचे प्रमुख आकर्षण ठरले आहे.पारंपरिक नंबर पिनसारख्या सुरक्षाव्यवस्थेची चोरी करणे सायबर गुन्हेगारांना तुलनेने सोपे जात होते. बोटांचे ठसे किंवा चेहरा याद्वारे व्यवहार पूर्ण करण्याची सोय उपलब्ध झाल्यास, सायबर गुन्हेगारांना याचे बनावटीकरण करणे तुलनेने अवघड जाणार आहे. ज्या देशांत ही सुविधा सुरू आहे, तेथे फसवणुकीचे प्रमाण ५० टक्क्यांनी कमी झाल्याचा दाखला आहे. त्यामुळे आता आपल्याकडेही हे व्यवहार अधिक सुलभ व सुरक्षित होतील, असा विश्वास बाळगायला हरकत नाही.

## छत्रपती शिवाजी महाराज आजच्या काळात जन्मले तर!

# आपला मावळा संघटनेची राज्यस्तरीय निबंध स्पर्धा -खासदार नीलेश लंके यांची संकल्पना

**दैनिक वादळ वार्ता । अहिल्यानगर । प्रतिनिधी**

दिवाळीच्या उत्साहात आपला मावळा ही संघटना खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी आणि विचारप्रवर्तक उपक्रम घेऊन आली आहे. जर छत्रपती शिवाजी महाराज आजच्या काळात जन्मले तर या विषयावर राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून विद्यार्थ्यांना इतिहास आणि आधुनिक काळातील नेतृत्वगुण यांचा अभ्यास करण्याची त्यातून संधी मिळणार आहे.

**उपक्रमाचा उद्देश**

ही स्पर्धा ८ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी खुली असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा अभ्यास करून त्यांचा आधुनिक समाजाशी संबंध कसा जुळवता येईल, यावर आपले विचार मांडण्याची संधी मिळणार आहे. आदर्श नेतृत्वाची प्रेरणा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे, समाजिक बांधिलकीची जाणीव वाढवणे, स्वराज्य, धैर्य आणि न्याय यांची संकल्पना आजच्या काळात कशी लागू शकते हे समजून घेणे हा या उपक्रमामागील हेतू आहे.

**स्पर्धेविषयी माहीती**

या स्पर्धेचा कालावधी शनिवार दि. ११ऑक्टोबर ते गुरूवार दि. २३ ऑक्टोबर असा आहे. दिलेल्या विषयावर हस्तलिखित ३०० ते ४०० शब्दांपर्यंत निबंध लिहावा. ई मेल किंवा पोष्टाद्वारे लिहिलेला निबंध पाठवावा. निबंध पाठविण्यासाठी ई मेल आयडी : ररश्रिरार्रीश्ररसारळश्र.ले

पोष्टाने पाठविण्यासाठी पत्ता : खासदार नीलेश लंके संपर्क कार्यालय, ईगल प्राईड बिल्डिंग, चाणक्य चौकाजवळ, अहिल्यानगर ४१४००१ तसेच खासदार नीलेश लंके संपर्क कार्यालय, समर्थ कॉम्प्लेक्स, पारनेर सुपा रोड, पारनेर जिल्हा अहिल्यानगर ४१४३०२निबंधासोबत विद्यार्थ्यांनी पूर्ण नाव, वय, पत्ता आणि संपर्क क्रमांक नमूद करणे आवष्यक आहे. विषयाबाहेरील किंवा नियमांचे पालन न करणारे निबंध स्वीकारले जाणार नाहीत. स्पर्धेसबंधातील अधिक माहितीसाठी ९४२२४५८४६२ व ९६३७९४३३३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्यास १० हजार ३३३ रूपये रोख, स्मृतीचिन्ह तसेच सन्मानपत्र, व्दितीय क्रमांकास ७ हजार ३३३ रूपये, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र, तृतीय क्रमांकास ५ हजार ३३३ रूपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, चतुर्थ क्रमांकास ३ हजार ३३३ रूपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र तर पाचव्या क्रमांकास २ हजार ३३३ रूपये, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तर स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना खा. नीलेश लंके यांची स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

**स्वराज्याची संकल्पना जागवण्याचा प्रयत्न**

ही स्पर्धा केवळ लेखनासाठी नाही, तर विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना देणारी, नेतृत्वगुण वाढवणारी आणि इतिहासातील आदर्शांचे आधुनिक काळाशी संबंध समजावणारी एक संधी आहे. विद्यार्थ्यांना विचार करण्याची संधी मिळेल की छत्रपती शिवाजी महाराज आजच्या जगात जन्मले असते तर त्यांनी समाजातील आव्हाने, तंत्रज्ञानाचा वापर आणि नेतृत्वगुण कसे दाखवले असते. आजच्या बदलत्या काळात स्वराज्याची, धैर्याची आणि सामाजिक बांधिलकीची संकल्पना पुन्हा जागवण्याचा हा उपक्रम महत्वाचा ठरेल. महाराष्ट्रभरातील विद्यार्थी आपला निबंध सादर करून आपल्या विचारांची साक्ष दाखवू शकतात.



# मासे खाल्ल्यानंतर आइस्क्रीम खाणे कितपत सुरक्षित? विषबाधा होऊ शकते का?

अनेकांना मांसाहारमध्ये मटण-चिकनपेक्षाही मासे खाणे खूप आवडते. पण त्याचसोबत मांसाहार केला की अनेकांना काहीतरी गोड किंवा थंड आइस्क्रिम खाण्याची इच्छा होते. मासे खाल्ल्यानंतर दूध, चहा वैगरे पिऊ नये हे सर्वांनाच माहित आहे. पण मासे खाल्ल्यानंतर आइस्क्रिम खाल्ले तर चालते का? त्याच्यामुळे काही समस्या तर होणार नाहीत ना? याबद्दल अनेकांना माहित नसते. तुम्हालाही मांसाहार किंवा मासे खाल्ल्यानंतर आइस्क्रिम खायला आवडत असेल तर हे जाणून घ्याच.

मासे खाल्ल्यानंतर दूध किंवा दुग्धजन्य पदार्थांसोबत मासे खाऊ नयेत. त्यामुळे पोटाच्या समस्या तसेच त्वचेच्या समस्या निर्माण होऊ शकतात. पण मासे खाल्ल्यानंतर आइस्क्रीम खाऊ शकता परंतु काही लोकांना पचनाच्या समस्याही होऊ शकतात. विशेषतः जर तुमची पचनक्रिया संवेदनशील असेल किंवा तुम्हाला विशिष्ट एलर्जी असेल तर त्याचे लगेच परिणाम जाणवू शकतात.

मासे खाल्ल्यानंतर आइस्क्रीम खाण्याआधी काही गोष्टी लक्षात ठेवा

थोड्या वेळाने खा : मासे खाल्ल्यानंतर आइस्क्रीम खाण्यासाठी काही वेळ जाऊ द्या. मासे खाल्ल्यानंतर लगेचच आइस्क्रीम खाण्याऐवजी किमान एक ते दीड तास थांबण्याचा प्रयत्न करा.

तुमच्या शरीराकडे लक्ष द्या : जर मासे खाल्ल्यानंतर तुम्ही आइस्क्रीम खाल्ले आणि त्यानंतर तुम्हाला काही अस्वस्थता वाटत असेल तर लगेच डॉक्टरांशी संपर्क करा.आणि नंतर असे करणे टाळा.

एलर्जी किंवा संवेदनशीलता : जर तुम्हाला कोणतीही एलर्जी असेल किंवा तुमची पचनक्रिया संवेदनशील असेल, तर दोन्ही एकत्र खाणे टाळा. किंवा शक्य असल्यास मासे खाल्ल्यानंतर दूधाचे पदार्थही खाणे टाळणे चांगले म्हणून आइस्क्रीम खाणे टाळलेले कधीही चांगले.

तसेच मासे खाल्ल्यानंतर या पदार्थांचे देखील सेवन करणे टाळा

दूध किंवा दुग्धजन्य : मासे खाल्ल्यानंतर दूध किंवा दुग्धजन्य पदार्थ खाणे टाळावे. काही लोक दही किंवा दुधात मासे शिजवतात. हे योग्य नाही. दूध, दही किंवा इतर दुग्धजन्य पदार्थांसोबत मासे खाणे पचनासाठी चांगले नाही. यामुळे अपचन, पोटफुगी, पोटदुखी, त्वचेचे संक्रमण आणि त्वचेवर पांढरे डाग यासह इतर समस्या उद्भवू शकतात. यामुळे पचनसंस्थेच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो.

लिंबूवर्गीय फळ : लिंबूवर्गीय फळांसह मासे खाणे टाळा. जर तुम्ही मासे खात असाल तर त्यासोबत लिंबूवर्गीय फळे खाणे टाळा. काही लोक सॅलडमध्ये लिंबूवर्गीय फळे घालतात आणि माशासोबत खातात. या फळांपासून बनवलेला रस देखील टाळा. मासे आणि लिंबूवर्गीय फळांचे मिश्रण आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. लिंबू, संत्री, टोमॅटो आणि किवी सारखी लिंबूवर्गीय फळे आम्लयुक्त असतात. मासे हे प्रथिनांचे प्रमुख स्रोत आहे. जेव्हा हे दोन्ही घटक एकत्र येतात तेव्हा ते प्रतिक्रिया देऊ शकतात, ज्यामुळे पोटाच्या समस्या उद्भवू शकतात.

बटाटे आणि पास्ता : बटाटे आणि पास्ता सारख्या जास्त स्टार्चयुक्त पदार्थांसह मासे खाणे देखील टाळावे. यामुळे जास्त कॅलरी आणि कार्बोहायड्रेटचे सेवन होऊ शकते. यामुळे पचनसंस्था मंद आणि मंद होऊ शकते, ज्यामुळे तुम्ही जे काही खात आहात ते पचवणे कठीण होते.

चहा आणि कॉफी : काही लोक जेवताना चहा आणि कॉफी पितात. मासे खाताना कॉफी पिणे हे एक अस्वास्थ्यकर अन्न संयोजन असू शकते. यामुळे शरीर माशांमध्ये असलेले पारा योग्यरित्या शोषण्यापासून रोखू शकते.

# अक्कलकुवा पोलिसांकडून ३० लाखांची बनावट दारू निर्मिती फॅक्टरी उद्धस्त; ६ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

अक्कलकुवा पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे मोठी कारवाई करत मोरंबा गावात सुरू असलेला बनावट दारू निर्मितीचा कारखाना उद्धस्त केला आहे. या कारवाईत बनावट दारू, निर्मितीचे साहित्य आणि दोन वाहनांसह एकूण ३० लाख ६४ हजार २६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी एका महिलेसह सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाली होती की, मोरंबा येथील रिना पाडवी (रा. मोरंबा, ता. अक्कलकुवा) ही महिला तिच्या घराजवळच्या गोडाऊनमध्ये काही इसमांच्या मदतीने मानवी जीवितास अपायकारक भेसळयुक्त बनावट दारू बनवून तिची चोरटी विक्री करत आहे.या माहितीच्या आधारे सारंग नवलकार, पोलीस निरीक्षक, अक्कलकुवा पोलीस ठाणे यांनी वरिष्ठांना माहिती देऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ११/१०/२०२५ रोजी सायंकाळी ७. ३० वाजता पोलीस पथकासह सदर ठिकाणी छापा टाकला.छापा टाकलेल्या गोडाऊनमध्ये रिना पाडवी हिच्या सांगण्यावरून आणि स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी पाच इसम बनावट दारूची निर्मिती करताना रंगेहाथ पकडले गेले. दारू निर्मिती किंवा विक्रीचा कोणताही परवाना नसताना हे आरोपी कार्यरत होते.पोलिसांनी घटनास्थळावरून बनावट दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे प्लास्टिकच्या बाटल्या, बॉटलिंग मशीन, विविध कंपन्यांचे प्लास्टिकचे बुच, रसायने, मोटार मशीन, खाकी बॉक्स, चिकटपट्ट्या, कॉटन रोल, अल्कोहोल मीटर, प्रिंट केलेले कागदी लेबल, भेसळयुक्त बनावट दारू आणि विविध कंपन्यांचे ५ मोबाईल जप्त केले. यासोबतच एक पिकअप (क्र. एमएच ४३ बीजी ०१५७) आणि एक क्रेटा (क्र.



युपी ३२ एन वाय ३८३८) ही दोन वाहनेही जप्त करण्यात आली. एकूण ३० लाख ६४ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.
याप्रकरणी रिना पाडवी हिचेसह खालील पाच इसमांविरुद्ध अक्कलकुवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे:
१. विकाससिंग हरिहरसिंग (रा. भादर, जि. अमेठी, उत्तर प्रदेश)
२. मदनलाल बसंतलाल वर्मा (रा. बंडाखुटार, जि. प्रतापगढ, उत्तर प्रदेश)
३. राजेश रामकरण जयस्वाल (रा. गोराबारीक, जि. सुलतानपूर, उत्तर प्रदेश)
४. परमानंद रामचंद्र रॉय (रा. लालबेगिया, जि. मुतीहारी, बिहार)
५. इंद्राज संतोष सरोज (रा. देवरायपुर, जि. प्रतापगड, उत्तर प्रदेश)
आरोपींविरुद्ध बी.एन.एस. कलम १२३, २७४, २७५ आणि महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम ६५ (B), ६५(C), ६५(D), ६५(F), ६५(E) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
ही कामगिरी श्रवण दत्त, पोलीस अधीक्षक नंदुरबार, आशित कांबळे, अपर पोलीस अधीक्षक नंदुरबार, सुभाष भोये, उपविभागीय पोलीस अधिकारी, अक्कलकुवा उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सारंग नवलकार आणि त्यांच्या पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी यशस्वीरित्या पार पाडली. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस

## रूपचंद कांबळे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माजलगाव तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) यांच्याकडून संघटनात्मक कार्याला अधिक गती देण्यासाठी माजलगाव तालुक्यातील नवीन जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पक्षाचे तालुका अध्यक्ष विघ्नेश्वर जनार्धन थावरे यांनी रूपचंद कांबळे यांची माजलगाव तालुका उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे.

तालुका अध्यक्ष थावरे यांनी दिलेल्या नियुक्तीपत्रात नमूद केले आहे की, शरदचंद्र पवार साहेबांच्या पुरोगामी विचारसरणीचा प्रसार आणि संघटन बळकट करण्यासाठी रूपचंद कांबळे यांनी तालुक्यात सक्रिय भूमिका बजावावी. प्रत्येक घटकांपर्यंत पक्षाच्या धोरणांची पोहोच व्हावी यासाठी त्यांनी कार्य करावेअशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.



रूपचंद कांबळे हे अनेक वर्षांपासून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत असून पक्षाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांशी त्यांचा घनिष्ठ संपर्क आहे. त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांद्वारे युवकांना एकत्र आणत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारसरणीबद्दल जनजागृती केली आहे. त्यामुळे त्यांच्या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये या नियुक्तीमुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, अनेकांनी कांबळे यांचे अभिनंदन करून त्यांना भावी राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.या नियुक्तीनंतर पक्ष संघटनेला नवचैतन्य प्राप्त होऊन माजलगाव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) अधिक मजबुतीने उभा राहील, असा विश्वास कार्यकर्त्यांमधून व्यक्त केला जात आहे.

## केमवाडी येथे शालेय ग्रंथालयाचे उद्घाटन उपक्रमशीलतेतून मराठी भाषेचा गौरव

### श्रमदानातून साकारले उपक्रमशील शिक्षक हरिश्चंद्र खेंदाड यांचे कार्य

दैनिक वादळ वार्ता
**इंदापूर । प्रतिनिधी**

तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केमवाडी येथे वंदना आलमद यांच्या लोकवाटा या उपक्रमासह उपक्रमशील शिक्षक हरिश्चंद्र खेंदाड यांच्या श्रमदानातून साकारलेल्या शालेय ग्रंथालयाचे उद्घाटन करण्यात आले.

अभिजात मराठी भाषा सप्ताह सांगता समारंभाच्या औचित्यावर या ग्रंथालयाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सर्जेराव पाटील, सरपंच गजानन कोकरे आणि उपसरपंच अशांत फंड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक सुधीर जाधव, ग्रामविकास अधिकारी महेश शिंगाडे आदी



आलेल्या *मराठी भाषा सप्ताहा*त केमवाडीच्या जिल्हा परिषदेच्या शाळेने विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज ग्रंथालय उभारून मराठी भाषेच्या संवर्धनाची परंपरा जोपासली. या अभिनव उपक्रमाबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

शेख, रज्जाक शेख, अण्णासाहेब काशिद, विष्णू टाटे, युवराज नकाते, मंजूर मुजावर आदी पालक, ग्रामस्थ आणि शिक्षकवृंद उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजयकुमार भालेराव यांनी केले, तर आभार रोहिणी माने यांनी मानले.

# १४ ऑक्टोम्बर रोजी पालघर जिल्ह्यात आदिवासी आरक्षण बचाव कृती समितीचा जनआक्रोश मोर्चा

## चला पालघर! चला पालघर! या घोषणांनी दुमदुमला परिसर

दैनिक वादळ वार्ता
**पालघर । प्रतिनिधी**

आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी आणि आरक्षण वाचवण्यासाठी आदिवासी आरक्षण बचाव कृती समिती, पालघर जिल्हा यांच्या वतीने १४ ऑक्टोबर २०२५ रोजी पालघर येथे जनआक्रोश विशाल मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. चला पालघर! चला पालघर! या घोषणांनी सध्या संपूर्ण जिल्ह्यात चळवळ पेटली आहे.संविधानात दिलेल्या पाचव्या अनुसूचीप्रमाणे आदिवासी समाज हा स्वतंत्र समाज असून, त्यांच्या संस्कृती, परंपरा, भाषा, जीवनपद्धती यांचे रक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी शासनावर आहे. मात्र मागील काही काळात अनुसूचित जाती–जमातींमधील आरक्षणाच्या वाटपात गोंधळ निर्माण झाला असून, आदिवासी समाजाचे हक्क धोक्यात आल्याची भावना निर्माण झाली आहे. आदिवासी बांधवांमध्ये संताप उसळला असून या अन्यायाविरोधात संघटित पद्धतीने आंदोलन उभारले जात आहे. आदिवासी आरक्षण बचाव कृती समितीने केलेल्या आवाहनानुसार, हा मोर्चा मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजताबिरसा मुंडा चौक (चार रस्ता), बोईसर रोड, पालघर येथून निघणार आहे. जिल्हाभरातील सर्व आदिवासी समाज, महिला, युवा, शेतकरी, विद्यार्थी, सामाजिक संघटना, सांस्कृतिक गट यांना या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आमदार विलास तरे,आमदार राजेंद्र गावीत, खासदार डॉ. हेमंत सवरा, माजी आमदार वनगा , जिल्हा परिषद सदस्य प्रतिभा गुरोडा, सुरेश रिंजड, सभापती योगेश गवा, रमेश सवरा, भास्कर दळवी, विलास बेलकर, अशोक ठाकरे, मीना धोदडे, जयेद्र दुबळा, सुनील धानवा, कृष्णा जाधव, नीता काटकर, विनोद मेढा, मोहन गुहे, विराज गडग, अशोक शिंगाडा, परशुराम चावरा विविध आदिवासी संघटनाचे प्रतिनिधी आणि सरपंच कर्यकर्ते उपस्थित होते. आदिवासींच्या आरक्षणावर डल्ला मारणाऱ्यांविरुद्ध आता निर्णायक लढा देण्याची वेळ आली आहे. हा मोर्चा केवळ आंदोलन नाही, तर आदिवासी अस्मिता, परंपरा आणि अस्तित्वाचा प्रश्न आहे.आमदार विलास तरे अध्यक्ष आदिवासी आरक्षण बचाव कृती समिती या मोर्चाच्या माध्यमातून शासनाला ठोस संदेश देण्याचा निर्धार आदिवासी समाजाने केला आहे. संपूर्ण जिल्ह्यात या मोर्चाबद्दल प्रचंड उत्साह असून, विविध भागांतून हजारो लोक सहभागी होणार आहेत. आमदार राजेंद्र गावीत तथा माजी आदिवासी विकास राज्यमंत्री.



## शालेय जीवनात वाचनाची आवड निर्माण होणे आवश्यक : लेखक रामदास कोतकर

### अभिजात मराठी भाषा सप्ताहनिमित्त ग्रंथप्रदर्शन आणि वाचक संवाद कार्यक्रम ; श्रद्धा सार्वजनिक वाचनालयाचा उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांना मोबाईल पाहण्याचे जणू व्यसन जडले आहे. त्यांना योग्य समुपदेशनाची गरज आहे. शिक्षक–पालकांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शालेय जीवनात वाचनप्रेम जडल्यास आयुष्याला कलाटणी मिळते, असे मत ग्रामीण कादंबरीकार साहित्यिक रामदास कोतकर यांनी व्यक्त केले.

पिंपळगाव वाघा (ता. नगर) येथील श्रद्धा सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आयोजित अभिजात मराठी भाषा सप्ताहनिमित्त ग्रंथप्रदर्शन आणि वाचक संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आत्मनिर्धार फाऊंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आदिनाथ वाबळे, शिक्षिका नीलम निघूट, आदी मान्यवर आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापिका यू. बी. सोनवणे यांनी



भूषविले. सोनवणे मॅडम म्हणाल्या की, वाचन चळवळ आणि भाषा समृद्धीसाठी सर्व स्तरांवर प्रयत्न होणे आवश्यक आहेत. महादेव गवळी यांनी 'गाव खेड्यात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत वाचन चळवळ टिकवण्यासाठी श्रद्धा वाचनालयाचे काम कौतुकास्पद' असल्याचे म्हटले. सचिव वसंत कर्डिले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर ग्रंथपाल यमुना कांडेकर यांनी आभार मानले.

## प्रामाणिक व्यवसाय केल्यास यश निश्चित मिळते–आदित्यनाथ महाराज

### नगर कल्याण रोड वरील होलसेल फटाका मार्केटचे उदघाटन संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

सालाबाद प्रमाणे याही वर्षी दिवाळीच्या सणा निमित्त नगर कल्याण रोड येथे दि अहमदनगर फटाका व्यापारी असो चे वतीने होलसेल फटाका मार्केट चे उदघाटन श्री विशाल गणेश मंदिराचे पुजारी श्री संगमनाथ महाराज याचे शिष्य श्री आदित्यनाथ महाराज यांचे हस्ते करण्यात आले. या वेळी असो. चे अध्यक्ष गणेश परभाणे, सचिव श्रीनिवास बोज्जा, उपाध्यक्ष विकास पटवेकर सह सदस्य सुनील गांधी, देविदास ढवळे, सोमनाथ रोकडे, साहेबराव गारकर, संभाजी कराळे, सतीश दारकुंडे, उबेद खान, मयूर भापकर, संतोष वल्ली, विजय मुनोत, संजय सुराणा, सागर हरबा, आदेश जाधव, प्रितम तोडकर, सतीश बनकर व अविनाश जिंदम आदी उपस्थित होते. या वेळी बोलतांना आदित्यनाथ महाराज म्हणाले गुरूकृपावंत संगमनाथजींच्या आशीर्वादाने आणि श्री विशाल गणपतीच्या मंगल कृपेने आज या फटाका मार्केटच्या शुभारंभ सोहळ्यात प्रमुख पाहुणा म्हणून उपस्थित राहण्याचं सौभाग्य मला लाभलं,



याबद्दल मी मनःपूर्वक आनंद आणि कृतज्ञता व्यक्त करतो.
दिवाळी म्हणजे आनंद, प्रकाश आणि एकतेचा उत्सव. फटाक्यांचा झगमगाट केवळ शोभा नसून तो आपल्या आतल्या आनंद, श्रद्धा आणि नवीन आशेचा तेज आहे.
या पवित्र दिवाळी काळात आपण सर्वांनी सुरक्षिततेने, संयमाने आणि सद्भावनेने उत्सव साजरा करू या. फटाक्यांच्या प्रकाशासोबत प्रत्येकाच्या जीवनात समृद्धी, आरोग्य आणि समाधान उजळू दे आपण प्रामाणिक व्यवसाय केल्यास निश्चितच आपल्याला यश प्राप्त होईल.
या वेळी असो चे सचिव यांनी स्वागत करून प्रशासनाने फटाका व्यवसाय परवाना लवकरात लवकर उपलब्ध करून दिल्याबद्दल जाहीर आभार मानले व उपस्थितांचे स्वागत केले, आभार सहसचिव अरविंद साठे यांनी मानले.

# बीडमध्ये संतापजनक घटना 'लक्ष्मी देवी' मूर्तीची विटंबना

## दगडाने मूर्तींची तोडफोड, अज्ञात आरोपी मोकाट!

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराला हादरवून सोडणारी एक अत्यंत गंभीर आणि संतापजनक घटना आज सकाळी उघडकीस आली आहे. शहरातील प्रसिद्ध कंकालेश्वर मंदिराच्या मागील बाजूस, सर्वे नंबर ९० मध्ये असलेले जागृत देवस्थान श्री लक्ष्मी आई मंदिरात पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास समाजकंटकांनी मंदिराची व मूर्तीची तोडफोड करण्याचा घृणास्पद प्रयत्न केला.या पवित्र स्थळाला गेल्या काही काळात वारंवार लक्ष्य केले जात आहे. यापूर्वी अशा प्रकारची विटंबना दोन ते तीन वेळा घडली असून, वारंवार तक्रारी दाखल करूनही हा प्रकार थांबत नसल्याने आता समस्त हिंदू धर्मीयांमध्ये तीव्र संतापाचे आणि असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

लक्ष्मी आई देवस्थानात दरवर्षी मोठ्या प्रमाणात जत्रा भरते आणि दररोज सकाळी भक्त दर्शनासाठी येतात. आज सकाळी नितीन रमेश कांबळे हे दर्शनासाठी जात असताना त्यांना हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. अज्ञात समाजकंटकांनी दगडांचा वापर करून देवीच्या मूर्तीची जाणीवपूर्वक तोडफोड करण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाले. या हल्ल्यात देवीच्या मूर्तीचे तसेच मंदिराचेही मोठे नुकसान झाले आहे.

या वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे समाजाच्या भावना तीव्रतेने दुखावल्या गेल्या आहेत. बीड शहरातील महत्त्वाचे धार्मिक स्थळ वारंवार लक्ष्य होत असतानाही, यावर कायमस्वरूपी उपाययोजना न केल्याबद्दल प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

पोलीस आणि राजकीय नेत्यांची तातडीची भूमिकाघटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तात्काळ मंदिराच्या ठिकाणी पंचनामा करण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. या दरम्यान, समाजाने आणि विविध संघटनांनी या घटनेचा जाहीर निषेध केला.

सकल हिंदू सेनेसह विविध हिंदू संघटनांच्या वतीने जाहीर निषेध करत, आरोपीला तात्काळ पकडून कठोर कारवाई करून शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. समाजाच्या भावना दुखावल्याची घटना असल्याने सर्व समाज एकत्र आला.

या घटनेची माहिती मिळताच, राष्ट्रवादीचे डॉ. योगेश भैया क्षीरसागर यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. त्यांनी पोलीस प्रशासनाला आरोपीला ताबडतोब अटक करून शिक्षा द्यावी असे आदेश दिले.

यावेळी संतोष अण्णा पाबळे, पिंटू भाऊ पवार, राणा चव्हाण, शिवसेना चे जिल्हा उपप्रमुख मामा जाधव, दत्ता गुणवंत, सुनील कांबळे, रंजीत घेणे, पुजारी योगीराज कांबळे तसेच इतर समाज बांधव व हिंदू बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलिसांनी तातडीने तक्रार नोंदवून घेतली असून, अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत. मात्र, अद्याप कोणत्याही आरोपीला पकडण्यात यश आलेले नाही आणि पुढील कारवाई अजूनही सुरूच आहे. भाविकांच्या तीव्र भावना लक्षात घेता, प्रशासनाने या गंभीर प्रकरणात तात्काळ आणि कठोर पाऊले उचलणे अपेक्षित आहे. या घटनेमुळे बीड शहरात तणावाचे वातावरण असून, पोलीस प्रशासन या वारंवार घडणाऱ्या प्रकारांना कसा आळा घालते आणि आरोपींवर कठोर कारवाई कधी करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## सावतामाळी मंदीर परिसरातील वाढती गुन्हेगारी रोखण्या साठी सर्व अवैद्यधंदे तात्काळ बंद करा–राजकुमार डाके

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी । प्रतीनीधी**

शहरातील सावतामाळी मंदीर परिसरात वाढती गुन्हेगारी थांबवण्यासाठी सावता माळी मंदिर परिसरात सुरु असलेले सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करुण या परिसरातील नागरीकांना भयमुक्त करावे अशी मागणी राजकुमार डाके यांच्यासह असंख्य सामाजीक कार्यकर्त्यांच्या वतीने संभाजी नगर पोलीस स्टेशनचे पोलीस नीरीक्षण मा. धनंजय ढोणे साहेब यांना प्रत्यक्ष भेटुन लेखी निवेदणा द्वारे करण्यात आली आहे.



गेल्या अनेक वर्षापासुन सावता माळी मंदीर परिसरातील कीर्ती नगर, कृष्णा नगर, गंगासागर नगर, सिध्देश्वर नगर या परिसरात अवैध धंद्याचा विळखा पडलेला आहे या अवैध धंद्यामुळे भावी पीढी व्यसनाच्या आहारी जाऊन गवैद्य मार्गाला लागत आहे.यातुनच देवीदास शिंदे आत्महत्या प्रकरण, अनेक मुलींना छेडछाड, शालेय विद्यार्थ्यांना मारहान सारखे अनेक गंभीर गुन्हे घडले आहेत. या गुन्हेगारी अपप्रवृत्तीला ना जात पात नसुन हि अपप्रवृत्ती आहे ती आलीकडच्या काळात या परिसरात प्रचंड प्रमाणात वाढलेली दीसत आहे.याच परिसरात अनेक शाळा, कॉलेज, गुरुकुलातुन हजाघरो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत येथील अवैद्य धंद्यामुळे तेथील अनेक विद्यार्थी त्यांच्या लहान वयातच वाईट व्यसनाच्या आहारी जात आहेत यातुन भांडणे, तंटे, वादविवाद, माता भगीणींची छेडछाड आदी प्रकार घडत आहेत. यातुन अनेकांचे संसार ऊद्धवस्त झाले असुन अनेक जणांनी आपले आयुष्य संपवल्याचे हि प्रकार घडले आहेत. लहान लहान मुले गुन्हेगारीकडे वळताना दिसत आहेत यातुन भावीपीढी ऊद्धवस्त होत आहे. हे सर्व प्रकार थांबवण्या साठी तात्काळ कीर्तीनगर, कृष्णानगर, गंगासागर नगर, सिद्धेश्वर नगर सह सावतामाळी मंदिर परिसरातील सर्व अवैद्य धंदे तात्काळ कायमचे बंद करण्याची लेखी मागणी राजकुमार डाके यांच्या वतीने संभाजी नगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा.धनंजय ढोणे साहेब यांच्याकडे करण्यात आली. या निवेदणावर सामाजीक कार्यकर्ते आनंत ईंगळे, योगेश पांडकर, बालासाहेब गायकवाड, भारत ताटे, दत्ता दहिवाळ, महेश बागवाले, सुरेश नानवटे, रामेश्वर फडकरी, अतूल माळी,काशिनाथ शंकुरवार, रविभाऊ मुळे, ञुशिकेश वानरे, वैजनाथ भोकरे, गणेश महाराज, आशोक महाराज, माधव वानरे, शिवाजी फड, नागनाथ मुंडे, जालींदर फड आदींच्या वतीने देण्यात आले.

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सरसकट पीकविमा मिळावा यासाठी शिवसेनेचं लातूर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक वादळ वार्ता**
**लातूर । नदीम पटेल**

अतिवृष्टीमुळे लातूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर पीक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तात्काळ आणि सरसकट पीकविमा मिळावा, यासाठी शिवसेनेच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनप्रसंगी शिवसेना राज्य समन्वयक मा. आमदार डॉ. राजनजी साळवी यांची प्रमुख उपस्थिती होती. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना कटिबद्ध असून तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. निवेदन देताना शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने, शिवाजीराव माने, ब्रम्हाजी केंद्रे, तालुकाप्रमुख बाबुरावजी शेळके, कोंडीरामजी काळे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख जयश्रीताई भुतेकर, अर्चनाताई बिराजदार, महिला उपजिल्हाप्रमुख दिशाताई देशमुख, महानगरप्रमुख प्रगतीताई डोळसे, महिला शहरप्रमुख गाडेकरताई, युवासेना जिल्हाप्रमुख कुलदीपजी सूर्यवंशी, विजयजी कसपटे, युवराजजी वंजारे, युवासेना लोकसभाअध्यक्ष कृष्णाजी सरवदे, मोहनजी दिवटे, आकाशजी बजाज, यशवंत कदम, भगवान शिंदे आणि इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांचा प्रश्न हा केवळ आर्थिक मदतीचा नसून त्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. त्यामुळे वेळ न घालवता, सर्व शेतकऱ्यांना पीकविमा योजना अंतर्गत लाभ मिळवून द्यावा, अशी ठाम भूमिका शिवसेनेने मांडली. लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सरसकट पीकविमा मिळावा यासाठी शिवसेनेचं लातूर जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.




## भिगवण पोलीसांच्या तत्परतेमुळे घरफोडी चोरीचा मुख्य आरोपी अटक, लाखोंचा मुद्देमाल हस्तगत

**दैनिक वादळ वार्ता**
**भिगवण। प्रतिनिधी**

भिगवण पोलीस स्टेशनच्या दमदार कामगिरीमुळे एका मोठ्या घरफोडी चोरी प्रकरणाचा मुख्य आरोपी जेरबंद झाला असून, लाखोंच्या सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम पोलीसांनी हस्तगत केली आहे.दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२:३० ते १४:०० वाजताच्या सुमारास भिगवण गाव, वार्ड क्र. ४ येथील फिर्यादी योगेश उर्फ पांडुरंग नामदेव जानराव यांच्या घरातून अज्ञात चोरट्याने चोरी केली. आरोपीने घराचे टेरेसवरून चढून खिडकीची जाळी तोडली आणि दरवाजा उपडून घरात प्रवेश केला. फिर्यादीचे वडील एका खोलीत कोंडले असून, दुसऱ्या खोलीतील लोखंडी कपाटाचा दरवाजा तोडून त्यामध्ये ठेवलेले सोन्या, चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ५,४४,३३२/- रूपयांचा मुद्देमाल चोरी करून नेला.सदर चोरीमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले, त्यामुळे भिगवण पोलीसांसमोर ही बाब त्वरित उकलण्याचा मोठा आव्हान उभा राहिला.भिगवण पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी श्री. विनोद महांगडे, सहा. पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथक स्थापन करण्यात आले. तपास पथकातील संतोष मखरे व योगेश कुलकर्णी यांनी परिसरातील ५० पेक्षा जास्त सी.सी.टी.व्ही. फुटेज बारकाईने तपासल्या आणि संशयित व्यक्तीचा शोध घेतला. यासाठी महाराष्ट्र कायम पोलीस ग्रुपवर फोटो प्रसारित केला असता, संशयित आरोपी छोडु उर्फ अस्लम उर्फ राजु कुंडलीक म्हेत्रे याची माहिती मिळाली.सदर आरोपी घरफोडी करताना बाथरूमच्या पाईपवरून चढत असे, जवळ कधीही मोबाईल वापरत नसे आणि त्याचे राहण्याचे ठिकाण नियमित बदलत असे. तपासात असे लक्षात आले की आरोपी यापूर्वी एकूण १२ गुन्ह्यांसाठी पोलिसांच्या नोंदीत होता, ज्यात घरफोडी व चोरीचे विविध प्रकरणे समाविष्ट आहेत

तपासकर्मी अमित पाटील, पोलीस उपनिरीक्षक, भिगवण पोलीस स्टेशन यांच्यासह महेश उगले, सचिन पवार, संतोष मखरे, योगेश कुलकर्णी यांनी आरोपीचा शोध लातूर व कर्जत, जि. रायगड येथे घेतला. आरोपीने पोलीसांना टाळाटाळ करत पळ काढण्याचा प्रयत्न केला; मात्र सात दिवसांच्या सततच्या शोध व गुप्त माहितीच्या मदतीने पोलीसांनी दिनांक ०१/१०/२०२५ रोजी कर्जत, जि. रायगड येथून आरोपीला ताब्यात घेतले.अटक केल्यानंतर आरोपीने चोरीची कबुली दिली. त्याच्याकडून ३,१३,६९२/- रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला गेला आहे. आरोपीची पोलीस कस्टडी दिनांक ०८/१०/२०२५ पर्यंत मंजूर करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमित पाटील करत आहेत.भिगवण पोलीसांची ही कामगिरी नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण करणारी ठरली आहे. चोरीविरुध्द कडक कारवाई व तांत्रिक साधनांचा प्रभावी वापर करून आरोपीला ताब्यात घेणे पोलीस यंत्रणेसाठी एक आदर्श उदाहरण आहे.




## वन्यजीव सप्ताह २०२५ उत्साहात साजरा

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे ठकूबाई परशुराम खारपाटील इंग्लिश मिडीयम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज चिरनेर, उरण जिल्हा रायगड येथे महाराष्ट्र शासन वनविभाग अलिबाग वनपरीक्षेत्र उरण व फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था चिरनेर यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताह (Wildlife Week) २०२५ साजरा करण्यात आला. वन्यजीव छायाचित्र प्रदर्शन व वन्यजीव पुस्तक प्रदर्शन देखील फॉन संस्थेतर्फे भरविण्यात आले होते.या प्रदर्शनामध्ये विविध विषारी, बिनविषारी सापांच्या छायाचित्रांच्या सोबत पक्षी,कीटक, उभयचर,पतंग, फुलपाखरे,तसेच वेगवेगळे प्रकारच्या वन्यजीवांची फॉन संस्थेच्या स्वयंसेवकांनी काढलेली छायाचित्रे प्रदर्शनात दाखविण्यात आली. वनविभागाचे व फॉन संस्थेचे कार्य याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. परिसंस्था का महत्वाचे आहेत तसेच अन्नसाखळी कशी तयार होते, वन्यजीवांचे आपल्या आयुष्यातील स्थान तसेच त्यांचे मानवास होणारे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष फायदे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व माहिती सांगून वन्यजीव संरक्षण,वृक्ष लागवड व संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले.वन्यजीव सप्ताह २०२५ साठी मुलांना फॉन संस्थेचे सदस्य व वन्यजीव अभ्यासक निकेतन रमेश ठाकूर यांच्या तर्फे माहिती देण्यात आली व दृकश्राव्य माध्यमातून रायगड जिल्हा पक्षी तिबोटी खंड्या (Black-necked Dwarf Kingfisher) या पक्षाबद्दलचा वन्यजीव छायाचित्रकार मनीष कदम यांनी चित्रित केलेला वन्यजीव माहितीपट दाखविण्यात आला.आताच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शाळांमध्ये पर्यावरण शिक्षणाचे धडे व प्रत्यक्ष वन्यजीव आणि निसर्गाच्या संरक्षणाचे धडे व अनुभव मिळावा म्हणून या अश्याप्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन शासनस्तरावर तसेच निसर्ग संवर्धन संस्थामार्फत केले जाते.हा प्रयत्न विद्यार्थ्यांच्या मनात वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनाचे मूल्य पेरणारा आहे.या कार्यक्रमासाठी एकूण २०० विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकतेर कर्मचारी आणि उरण वनविभागाचे वनरक्षक उपस्थित होते.



## २० लाख ६४ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू वाहनासह जप्त

**दैनिक वादळ वार्ता**
**लातूर । नदीम पटेल**

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात अवैध धंद्यावर कठोर कारवाई साठी मोहीम जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.त्या अनुषंगाने अवैध धंद्यावर कारवाई करीत असताना दिनांक ०८ ऑक्टोंबर व ०९ ऑक्टोंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहितीवरून काही इसम महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ गुटखा व तंबाखूजन्य पदार्थाची अवैध विक्री व्यवसाय, वाहतूक व साठवणूक करत असल्याची माहिती मिळाली.सदर माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे मार्गदर्शनात सदरचे पथक दिनांक ०८ व ०९ ऑक्टोंबर रोजी लातूर शहरातील विविध ठिकाणी सापळा लावून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित केलेला गुटखा व सुगंधित तंबाखूची अवैध विक्री व्यवसाय, वाहतूक करणाऱ्या वर ०२ गुन्हे दाखल करण्यात आले असून दोन्ही गुन्ह्यात ०८ लाख १४ हजार ९४६ रुपयांच्या प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच गुन्ह्यामध्ये वापरलेली १२ लाख ५० हजार रुपयाची दोन चारचाकी वाहन असा एकूण २० लाख ६४ हजार ९४६ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.प्रतिबंधित गुटख्याची अवैधरित्या विक्री, वाहतूक, साठवणूक करताना मिळून आलेले इसम नामे १) अनिल विजयकुमार भिसे वय २४ वर्ष राहणार, राजेशिवाजीनगर, लातूर. २) अकीब मोहम्मदसाब शेख, वय ३१ वर्ष, राहणार पटेल चौक, माळे गल्ली, लातूर. ३) मुनवर सादिक पटवेकर, वय ३१ वर्ष, राहणार मैसूर कॉलनी, लातूर. ४) एजाज हुजूर शेख, राहणार सुजाउद्दीन कॉलनी, ताजुद्दीनबाबा दर्गा जवळ, लातूर. (फरार) याचेविरुद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी येथे दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून गुन्ह्याचा पुढील तपास एमआयडीसी पोलीस करीत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख, पोलीस अंमलदार रियाज सौदागर, साहेबराव हाके, मोहन सुरवसे, मनोज खोसे, सचिन धारेकर, अर्जुन राजपूत, डांगे, राजेश कंचे यांनी केली आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077